10-05-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 5/9/2025 11:31 PM Page 1



## निवडक




### बाहेरीलवाडा केरी येथे उद्या 'इथे ओशाळला मृत्यू' नाटक

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ९ :** युनायटेड ग्रुप बाहेरीलवाडा केरी सत्तरीच्या दुसऱ्या वर्धापनदिन सोहळ्यानिमित्त रविवार दि. ११ रोजी श्री शंकरनाथ मठ बाहेरीलवाडा केरी – सत्तरी येथे रात्री ८.३० वाजता वसंत कानेटकर लिखित व वासुदेव गावस दिग्दर्शित तीन अंकी ऐतिहासिक नाटक 'इथे ओशाळला मृत्यू' सादर करण्यात येणार आहे.नाटकाचे निर्माते श्री हनुमान कला वैभव विर्डी खालचीवाडी हे आहेत.

या नाटकात आकाश चौकुळकर (संभाजी), रवी मसुरकर (औरंगजेब), अशोक बोकारकर (कविकलश), प्रदीप गावस(मौलाना फकीरुद्दीन), रविकांत चौकुळकर (आसदखान), मनोज चौकुळकर (गणोजी शिर्के), ओंकार चौकुळकर (शेख निजाम ), उत्तम चौकुळकर (प्रल्हाद निराजी), भिसाजी घाडी (मल्होजी), शंकर आजरेकर (संताजी), विजय गावस (धनाजी), निखिल,समीर, रुपेश,गणेश (शिपाई), मनीषा परब (येसूबाई) यांच्या भूमिका आहेत.

---

### मोरजीत मिलाग्रीस चर्चचे उद्या वार्षिक फेस्ट



■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ९ :** मोरजी येथील अवर लेडी ऑफ मिलाग्रीस चर्चचे वार्षिक फेस रविवार दि. ११ रोजी साजरी होणार आहे. त्यानिमित्ताने मिलाग्रेस चर्च परिसरात आणि चर्चला विद्युत रोषणाईने चकाकी दिलेली आहे.

मोरजी येथील मिलाग्रीस चर्चला १२१ वर्षे पूर्ण होत असून तिला एक जुना इतिहास आहे. सर्व धर्म समभाव मानत या चर्चमध्ये फेस साजरे केले जाते. या फेस्ताला राज्यातील राज्याबाहेरील ख्रिस्ती बांधवांबरोबरच हिंदू धर्मातील नागरिकह मोठ्या मोठ्या श्रद्धेने येऊन सायबीन मायकडे आपले नवस फेडत असतात.

रविवारी या सायाबीन माईचं वार्षिक फेस्ट असल्यामुळे सकाळी ७ वाजता पहिले मिस त्यानंतर सकाळी दहा वाजता मिस आयोजित केले आहे.

---

### युनायटेड ग्रुप बाहेरीलवाडाचा उद्या वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ९ :** युनायटेड ग्रुप बाहेरीलवाडाचा दुसरा वर्धापनदिन सोहळा रविवार दि. ११ रोजी श्री शंकरनाथ मठ बाहेरीलवाडा केरी सत्तरी येथे विविध कार्यक्रमांनी साजरा होणार आहे. यानिमित्त संध्याकाळी ६ वाजता लहान मुलांच्या नृत्याचा कार्यक्रम होणार असून त्यानंतर ७ वाजता व्यासपीठ कार्यक्रम होणार आहे.

या कार्यक्रमाला विशेष आमंत्रित म्हणून आरोग्य तथा वन मंत्री विश्वजित राणे,प्रमुख पाहुण्या म्हणून स्थानिक आमदार तथा वन विकास महामंडळाच्या अध्यक्ष डॉ. देविया विश्वजित राणे,खास आमंत्रित केरीच्या जिल्हा पंचायत सदस्य देवयानी गावस, शंकरनाथ मठाचे मठाधीश चंद्रकांत गो. गावस, केरीच्या सरपंच सुप्रिया गावस, उपसरपंच उस्मान सय्यद,स्थानिक पंचसदस्य दीक्षा चंद्रकांत गावस व इतर पंचसदस्य, श्री शंकरनाथ मठाचे अध्यक्ष सुनील म्हाऊसकर, पत्रकार राघोबा लवू पेडणेकर, सरकारी प्राथमिक विद्यालय बाहेरीलवाडाचे मुख्याध्यापक संभाजीराव राणे, युनायटेड ग्रुप बाहेरीलवाडाचे अध्यक्ष सखाराम गावस उपस्थित राहणार आहेत. रात्री ८ वाजता वसंत कानेटकर लिखित व वासुदेव गावस दिग्दर्शित तीन अंकी ऐतिहासिक नाटक 'इथे ओशाळला मृत्यू' सादर करण्यात येणार आहे.

---

### साखळीत १७ रोजी दिंडी महोत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ९ :** सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ सांखळी व कला आणि संस्कृती संचालनालय पणजी यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. १७ रोजी संध्याकाळी ५ वाजता जुना बस स्टॅन्ड सांखळी येथे अखिल गोवा दिंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

विजेत्यांना प्रथम पारितोषिक रु. ५० हजार,द्वितीय रु. ३५ हजार,तृतीय रु. २५ हजार, चौथे रु. १५ हजार व प्रत्येकी रु. ५ हजारांची दोन उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात येणार आहेत.अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी गजानन नार्वेकर (९८८१२३५०२०), शैलेश काणेकर (७८७५७९७०००) किंवा शाणू वळवईकर (९८२३३६११२०) या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

### हरमल दूर्वांकुर नाटयस्पर्धेचा आज बक्षीस वितरण समारंभ

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ९ :** येथील दुर्वांकुर कला केंद्र आयोजित हरमल ग्राम मर्यादित ७ व्या नाट्य स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा शनिवार १० रोजी संध्याकाळी ५.३० वाजता पंचायत सभागृहात आयोजित करण्यात आल्याची माहिती संस्थेचे उपाध्यक्ष प्रकाश नाईक रामजी व सचिव अर्जुन गडेकर यांनी दिली. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे प्रा गोरख मांद्रेकर तसेच हरमल जिप सदस्य, स्पर्धेचे पुरस्कर्ते रंगनाथ कलशावकर, समाज कार्यकर्ते दिलीप वायंगणकर व अमित नाईक उपस्थित राहणार आहेत. तसेच ह्या सोहळ्यास सरपंच अनुपमा मयेकर, पंच सदस्य सुशांत गावडे उपस्थित राहणार आहेत. तसेच ह्या सोहळ्यात हरमल गावातील ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नाट्य कलाकाराचा तीन ते पाच मिनिटांचा नाट्य संवाद सादरीकरण होईल. या सादरीकरणासाठी वेशभूषा व रंगभूषा सोय आहे, तसेच स्मृतिचिन्ह आयोजकातर्फे देण्यात येईल.सदर सादरीकरण अशोक हरमलकर व दत्ताराम ठाकूर यांनी पुरस्कृत केले आहे. तरी नाट्य संस्था व नाट्य प्रेमींनी उपस्थित राहावे, असे संस्थेतर्फे केले आहे.

---

### मांद्रे पुरखेवाडा येथे आज संगीत 'अमृत मोहिनी'

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ९ :** मांद्रे आस्कावाडा (पुरखेवाडा) येथे श्री रवळनाथ तरुण हौशी नाट्य मंडळातर्फे शनिवार १० मे रोजी रात्री ९.३० वाजता सुनील पुरखे दिग्दर्शित, संगीत 'अमृत मोहिनी' नाटक पूरखेवाडा श्री रवळनाथ मंदिर प्रांगणात होणार आहे. तरी नाट्य प्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन देवस्थान समितीने केले आहे.

# वनविभागाच्या मदतीने खैराच्या झाडांची बेकायदेशीर कत्तल?

## पंधरा दिवसांपासून कारवाई सुरू | महाराष्ट्रातील नोंदणीकृत वाहनांचा वापर

■ टीम दैनिक हेराल्ड



**पेडणे, दि. ९ :** विर्नोडा ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या भूतवाडी परिसरात मोठ्या प्रमाणावर खैराच्या झाडांची बेकायदेशीर कत्तल करून ती झाडे महाराष्ट्रात पाठवली जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. वन विभागाकडे मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या पंधरा दिवसांपासून ही कारवाई सुरू असून, यासाठी महाराष्ट्रातील नोंदणीकृत वाहने वापरली जात आहेत.

पेडणे पोलिसांना याबाबत सुगावा लागताच त्यांनी घटनास्थळी भेट दिली. तेथे कुणीही आढळून आले नाही. मात्र खैराच्या झाडांचे तुकडे केलेले स्पष्ट दिसून आले. यानंतर वन विभागाचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले असता, झाडांची मोठ्या प्रमाणावर कत्तल करून लाकूड चोरून नेल्याचे निष्पन्न झाले. विशेष म्हणजे, ही कारवाई सुरू असूनही संबंधित भागातील वन कर्मचाऱ्यांना याची कुठलीच खबर नव्हती, किंवा त्यांनी दुर्लक्ष केले असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. स्थानिकांकडून असेही बोलले जात आहे की, ही लूट थेट वनविभागाच्या कर्मचाऱ्यांच्या आश्रयानेच सुरू होती .

मिळालेल्या माहितीनुसार, खैराची ही लाकडे दररोज संध्याकाळी महाराष्ट्र राज्यात पाठवली जात होती. भूतवाडी ते विर्नोडा मुख्य रस्त्यावरून आणि नंतर राष्ट्रीय महामार्गाद्वारे सातार्डा मार्गे ही वाहतूक झाली असावी, असा संशय व्यक्त करण्यात येतो आहे. गोवा–महाराष्ट्र सीमावर्ती तपासणी नाक्यांवर वन विभाग व पोलिसांची तपासणी होत असतानाही ही वाहने कशी पास झाली, हा संशयाचा मोठा मुद्दा ठरत आहे.

याआधीही अशाचप्रकारे पेडणेतील एका वरिष्ठ वन अधिकाऱ्याचा खैर तस्करी प्रकरणात सहभाग उघड झाल्यानंतर त्याची बदली करण्यात आली होती. मात्र या प्रकरणाचा पुढील तपशील गुलदस्त्यातच राहिला आहे. ही घटना लोक विसरतील, असा समज करूनच नव्या स्वरूपात खैर तस्करी सुरू असल्याचा आरोप करण्यात येतो आहे.

दरम्यान, ७ मे रोजी भूतवाडी गावातील काही नागरिक जंगलात गेले असता त्यांना ही कत्तल सुरू असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर वन विभाग आणि पोलिसांनी संयुक्त शोधमोहीम राबवली, मात्र कुणालाही ताब्यात घेण्यात आले नाही. रात्रीच्या सुमारास झाडे घेऊन जाणाऱ्या चोरट्यांना पकडण्यासाठी वन कर्मचाऱ्यांनी दबा धरला, मात्र तोही निष्फळ ठरला.

स्थानिक नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केला जात आहे की, ज्यांना वनसंपत्तीच्या रक्षणाची जबाबदारी आहे, त्यांनी इतके दिवस नेमके काय केले? त्यांच्याकडून ही दुर्लक्ष झाली की मुद्दाम डोळेझाक केली गेली? वन खात्याकडून सामान्य नागरिकाला एखादे झाड तोडण्यासाठी अनेक अटी व अडथळे पार करावे लागतात. अशा वेळी खुलेआम चालणारी ही कत्तल आणि लाकूड तस्करी म्हणजे वन विभागासाठी एक लाजिरवाणी बाब ठरत आहे.

तसेच, यापूर्वी तिलारी कालव्यात पडलेल्या गवा रेड्याला रात्रभर मदतीविना सोडून देऊन वन अधिकाऱ्यांनी चांदेल परिसरातील बारमध्ये मौजमजा केल्याची घटना देखील स्थानिकांच्या स्मरणात आहे. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांकडून कार्यक्षमतेची अपेक्षा ठेवणेच व्यर्थ असल्याचे अनेक नागरिक म्हणत आहेत.

# हवाई हल्ला सूचना व ब्लॅकआउटसाठी कार्यपद्धती जाहीर

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ९ :** दक्षिण गोवा जिल्हाधिकाऱ्यांनी संभाव्य आपत्कालीन परिस्थितींना तोंड देण्यासाठी नागरी सज्जतेचा भाग म्हणून हवाई हल्ल्याच्या सूचना आणि ब्लॅकआउट प्रोटोकॉलसाठी मानक कार्यप्रणाली (एसओपी) जारी केली आहे. या एसओपीचे पालन सर्व सरकारी यंत्रणा, स्थानिक स्वराज्य संस्था, आपत्कालीन सेवा आणि सामान्य नागरिकांनी काटेकोरपणे करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

देशभरासाठी लागू असलेल्या या एसओपीनुसार, दोन मिनिटांचा सतत वाजणारा सायरन रेड अलर्ट' दर्शवेल. हा सायरन संभाव्य हवाई हल्ल्याचा इशारा देतो. हा अलर्ट मिळताच नागरिकांनी त्वरित जवळच्या हवाई हल्ला आश्रयस्थानांमध्ये किंवा संरक्षित खंदकांमध्ये आश्रय घ्यावा. अशी ठिकाणे उपलब्ध नसल्यास नागरिकांनी आपल्या घरातच राहावे, खिडक्या आणि बाह्य भिंतींपासून दूर राहावे आणि टेलिफोनचा अनावश्यक वापर टाळावा, जेणेकरून आपत्कालीन संपर्क सुलभ राहील.

धोका टळल्यानंतर, पुन्हा दोन मिनिटांचा सतत वाजणारा सायरन 'ग्रीन अलर्ट' देण्यात येईल, जो सर्व काही सुरळीत' असल्याचा संकेत असेल. यानंतर सर्वसामान्य दैनंदिन व्यवहार पूर्ववत सुरू करता येतील.

ब्लॅकआउटच्या उपाययोजनांमध्ये घरातील आणि बाहेरील सर्व प्रकारचे प्रकाश स्रोत बंद करणे किंवा झाकणे आवश्यक आहे. खिडक्यांना जाड, अपारदर्शक पडदे लावून कोणताही प्रकाश बाहेर जाऊ नये, याची काळजी घ्यावी. सार्वजनिक वाहतूक सेवा तात्पुरत्या थांबवण्यात याव्यात किंवा प्रकाशविना कार्यरत ठेवाव्यात, तर खासगी वाहने रस्त्यावरून हटवून त्यांच्या हेडलाईट्सही बंद कराव्यात.

जिल्हा प्रशासनाने सर्व आपत्कालीन ऑपरेशन सेंटर्सना बॅकअप वीज पुरवठा, आपत्कालीन प्रकाश व्यवस्था आणि सुरक्षित संप्रेषण साधने उपलब्ध ठेवण्याचे आदेश दिले आहेत. या केंद्रांनी लष्करी यंत्रणा, स्थानिक प्रशासन व शेजारील केंद्रांशी सतत संपर्कात राहावे. तसंच प्रशिक्षित कर्मचारी शिफ्टनुसार कामावर तैनात राहावेत, जेणेकरून कोणतीही अडथळा न येता सेवा सुरू राहतील.

हवाई हल्ल्यानंतर तात्काळ झालेल्या नुकसान, अडथळे किंवा जखमींची माहिती जवळच्या नागरी संरक्षण यंत्रणेला किंवा जिल्हा नियंत्रण कक्षाला दिली जावी. यानंतर संबंधित अधिकाऱ्यांच्या तपासणीनुसार सेवा आणि पायाभूत सुविधा पुनर्संचयित करण्याची प्रक्रिया अधिकृत पुनर्प्राप्ती प्रोटोकॉलनुसार केली जाईल. जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी सर्व शासकीय यंत्रणा आणि संस्थांना या सूचनांचे व्यापक प्रसारण करण्याचे आदेश दिले असून, सर्व स्तरांवर तयारी सुनिश्चित करण्यावर भर दिला आहे. कोणत्याही आपत्कालीन प्रसंगात जनतेच्या सुरक्षिततेसाठी या प्रोटोकॉलचे गंभीरतेने पालन करावे, असे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे.

# दक्षिण गोव्यात ड्रोन वापरावर बंदी

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ९ :** दक्षिण गोव्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी अंतर्गत सुरक्षेच्या वाढत्या धोक्यांच्या पार्श्वभूमीवर दक्षिण गोवा जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत ड्रोन आणि इतर कोणत्याही मानवरहित हवाई वाहनांच्या (यूएव्ही) वापरावर तातडीने बंदी घालण्याचे आदेश जारी केले आहेत.

जिल्हाधिकारी एग्ना क्लीटस यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम १६३ च्या अधीन राहून हा आदेश जारी केला आहे. या आदेशानुसार, कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही प्रकारचे किंवा श्रेणीचे ड्रोन उडवण्यास मनाई करण्यात आली आहे. आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबंधित व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कारवाई केली जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

हा निर्णय सध्याच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर घेतल्याचे अधिकृत निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय सीमांवरील तणाव, अंतर्गत सुरक्षेच्या मुद्द्यांमधील वाढ, तसेच महत्त्वाच्या पायाभूत सुविधांना संभाव्य धोका या गोष्टींचा विचार करून जिल्हा प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील सर्व उपजिल्हाधिकारी आणि उपविभागीय दंडाधिकाऱ्यांना या आदेशाचे काटेकोर पालन सुनिश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कोणत्याही उल्लंघनाबाबत एफआयआर दाखल करून न्यायिक दंडाधिकारी तसेच स्थानिक पोलिस ठाण्यांना त्वरित माहिती देण्याचे आदेशही त्यांना देण्यात आले आहेत.

दक्षिण गोव्यातील सर्व पोलिस ठाण्यांना या बंदीची माहिती देण्याची जबाबदारी पोलिस अधीक्षकांवर सोपविण्यात आली आहे. तसेच, भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २२३ अंतर्गत कोणताही उल्लंघन झाल्यास संबंधित नागरी अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.

जरी सर्वसामान्यांसाठी ड्रोन वापरावर बंदी असली, तरी सरकारी यंत्रणा, संरक्षण दल आणि आपत्ती व्यवस्थापन पथकांसाठी काही विशेष सवलती देण्यात आल्या आहेत. मात्र, अशा वापरासाठीही जिल्हाधिकाऱ्यांची पूर्व लेखी परवानगी आवश्यक आहे. अधिकृत कार्यासाठी पोलिस व अन्य सरकारी अधिकारी देखील आवश्यकतेनुसार ड्रोनचा वापर करू शकतात, परंतु त्यासाठी अधिकृत मंजुरी असणे बंधनकारक आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी नागरिकांना विनंती केली आहे की, त्यांनी या आदेशाचे काटेकोर पालन करावे आणि सार्वजनिक सुरक्षेसाठी सहकार्य करावे. राज्याच्या सुरक्षेची खात्री आणि नागरिकांच्या जीविताचा धोका टाळणे हेच आमचे मुख्य उद्दिष्ट आहे असेही त्यांनी नमूद केले.

# ब्ल्यू कॅप टॅक्सी चालकांच्या समस्येवर तोडगा

■ टीम दैनिक हेराल्ड


**पेडणे, दि. ९ :** मोपा आंतरराष्ट्रीय विमानतळावरील ब्ल्यू कॅप टॅक्सी व्यवसायिकांना येत्या दहा दिवसांत वाहतूक विभागाच्या अंतर्गत स्वतंत्र टॅक्सी काउंटर देण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी दिल्याची माहिती टॅक्सी संघटनेच्या सुदीप ताम्हणकर यांनी दिली. नागझर येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

यावेळी चांदील–हसापूरचे सरपंच तुळशीदास गावस, टॅक्सी संघटनेचे अध्यक्ष संजय कांबळी, तसेच ब्ल्यू कॅप टॅक्सी संघटनेचे पदाधिकारी महेश देसाई उपस्थित होते. पंधरा दिवसांपासून मोपा विमानतळावरील ब्ल्यू कॅप टॅक्सी काउंटर बंद असल्याने टॅक्सी व्यावसायिकांत तीव्र नाराजी होती. या संदर्भात सुदीप ताम्हणकर यांनी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांची भेट घेऊन निवेदन सादर केले होते. मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी या निवेदनावर सकारात्मक प्रतिसाद देत, हा प्रश्न लवकरच सोडवण्यात येईल. टॅक्सी चालकांना वाहतूक खात्याच्या अंतर्गत आणून त्यांच्या व्यवसायाची स्थिरता सुनिश्चित केली जाईल, असे आश्वासन दिल्याचे ताम्हणकर यांनी सांगितले.

ताम्हणकर पुढे म्हणाले, जोपर्यंत नवीन काउंटरसाठी प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण होत नाही, तोपर्यंत ब्ल्यू कॅप चालकांनी जीटीडीसीच्या इतर काउंटरशी तात्पुरती जोड घेऊन व्यवसाय सुरू ठेवावा, अशी सूचना मुख्यमंत्री सावंत यांनी दिली आहे. तथापि, यावर प्रतिक्रिया देताना टॅक्सी संघटनेचे पदाधिकारी महेश देसाई म्हणाले की , इतर काउंटरशी सलग्न होण्याचा प्रस्ताव आम्हाला मान्य नाही. आम्हाला स्वतंत्र काउंटर हवा आहे. आम्ही थोडा वेळ थांबण्यास तयार आहोत, परंतु आमचा व्यवसाय स्वतंत्रपणे चालावा हीच आमची मागणी आहे. सरपंच तुळशीदास गावस यांनी सांगितले की, मुख्यमंत्री सावंत हे लवकरच योग्य निर्णय घेतील याबाबत आम्हाला खात्री आहे. तोपर्यंत टॅक्सी व्यावसायिकांनी तडजोडीची भूमिका घेत इतर काउंटरचा पर्याय विचारात घ्यावा. परंतु ही तात्पुरती व्यवस्था असून, सरकारने लवकरात लवकर स्वतंत्र काउंटरची प्रक्रिया पूर्ण करावी.

# मडगाव नगरपरिषदेने लॉंच केली नवीन वेबसाईट

■ टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव, दि. ९ :** प्रशासनिक कार्यक्षमता आणि नागरी सेवांच्या वितरणात सुधारणा करण्याच्या उद्देशाने मडगाव नगर परिषद (एमएमसी) ने शुक्रवारी त्यांच्या अधिकृत वेबसाइटचे उद्घाटन केले. या वेबसाईटमुळे नागरिकांना त्यांच्या घरबसल्या विविध नागरी सेवा ऑनलाइन मिळवता येतील, ज्यामुळे महापालिका कार्यालयात प्रत्यक्ष भेटी देण्याची आवश्यकता कमी होईल.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढविणे असून, नागरिकांना त्यांच्या आवश्यक सेवांचा जलद आणि सोयीस्कर अनुभव मिळवून देण्यावर भर देण्यात आला आहे.

लॉंच कार्यक्रमात मडगावचे आमदार दिगंबर कामत यांनी मडगाव नगर परिषदेच्या डिजिटल तंत्रज्ञान स्वीकारण्याच्या प्रयत्नांचे कौतुक केले. त्यांनी प्रशासनाच्या प्रतिसादक्षमतेवर विशेष लक्ष केंद्रित करत, एमएमसीला सार्वजनिक तक्रारींचे निराकरण २४ तासांच्या आत करण्याचे आवाहन केले. रचनात्मक टीका होणे आवश्यक आहे. नगर परिषदेला समस्यांचे त्वरित निराकरण करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे, असे कामत म्हणाले. त्यांनी भारताची वाढती क्षमता आणि जागतिक आव्हानांचा सामना करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाच्या स्वीकाराला महत्त्व दिले. नवीन लॉंच झालेल्या वेबसाइटमुळे नागरिकांना कागदपत्रांसाठी अर्ज, बिल पेमेंट आणि तक्रार निवारणासह विविध नगरपालिका सेवांमध्ये सहज प्रवेश होईल अशी अपेक्षा आहे. नगराध्यक्ष दामोदर शिरोडकर यांनी सांगितले की, ही वेबसाइट मडगावच्या नागरिकांना डिजिटल पद्धतीने सक्षम बनविण्याच्या व्यापक योजनेची पहिली पायरी आहे.

वेबसाइट लॉंच केल्याने नागरिकांना चांगली सेवा मिळण्यास निश्चितच मदत होईल. भविष्यकाळात, ही वेबसाईट अधिक सक्षम होईल आणि नागरिक कार्यालयात न जाताही विविध सेवांचा लाभ घेऊ शकतील,असे शिरोडकर म्हणाले. शिरोडकर यांनी ही देखील स्पष्ट केले की, सार्वजनिक सेवा वितरणाच्या कार्यक्षमता सुधारण्यासाठी नवीन पद्धतींचा अवलंब करण्यासाठी परिषद वचनबद्ध आहे. हा उपक्रम एमएमसीच्या प्रशासनाचे आधुनिकीकरण करण्याच्या दृष्टिकोनाचा एक भाग असून, यामुळे प्रशासन अधिक सुलभ, जबाबदार आणि नागरिक–अनुकूल होईल. मडगाव नगर परिषद या उपक्रमाच्या माध्यमातून गोव्यातील इतर प्रगतीशील नगरपालिकांमध्ये सामील झाली आहे, जी स्मार्ट सिटी आणि डिजिटल इंडिया उद्दिष्टांशी सुसंगत डिजिटल प्लॅटफॉर्मचा स्वीकार करून प्रशासन आणि नागरिकांमधील अंतर कमी करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

# खर्चिक आधार दुरुस्ती प्रक्रियेमुळे ज्येष्ठ नागरिक संतप्त

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ९ :** आधार कार्डवरील किरकोळ चुका दुरुस्त करण्यासाठी नागरिकांना जटिल आणि खर्चिक प्रक्रियेचा सामना करावा लागत असून, मडगावमधील ज्येष्ठ नागरिकांना याचा विशेष फटका बसत आहे. नोंदणीवेळी डेटा एंट्रीमध्ये झालेल्या चुका दुरुस्त करताना आता प्रतिज्ञापत्र आणि सरकारी राजपत्रात दुरुस्ती प्रकाशित करण्याची सक्ती करण्यात आली आहे. यामुळे जवळपास २,८०० रुपयांचा खर्च नागरिकांच्या गळ्यात मारला जात आहे.

शुक्रवारी मडगाव येथील आधार दुरुस्ती केंद्रात मोठी गर्दी दिसून आली. रांगेत उभे राहून निराश झालेल्या नागरिकांनी केंद्रातील धोरणांवर नाराजी व्यक्त करत निषेध नोंदवला. फक्त नावातील स्पेलिंग दुरुस्तीसाठी इतकी मोठी प्रक्रिया का?, असा सवाल संतप्त नागरिकांनी उपस्थित केला. आर्लेम–रायचे रहिवासी जेरॉन कोलासो यांनी दिलेल्या माहितीनुसार, ८३ वर्षीय वृद्ध नागरिकाच्या आधार कार्डवरील नावात झालेली किरकोळ चूक दुरुस्त करताना त्यांना मोठा आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागला. सर्व वैध कागदपत्रे सादर करूनही, केंद्रातील कर्मचाऱ्यांनी नोंदणीदरम्यान केलेल्या चुकीसाठी आता आम्हालाच ७०० रुपयांचे प्रतिज्ञापत्र आणि २,१०० रुपयांचा राजपत्र खर्च सहन करावा लागतो आहे, असे कोलासो यांनी सांगितले. ही प्रक्रिया सरळसरळ दिवसा ढवळ्या लुटमार असून, वृद्ध आणि असंघटित वर्गावर अन्याय करणारी आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया कोलासो यांनी व्यक्त केली. त्यांनी सरकारकडे दुरुस्ती प्रक्रिया सुलभ आणि खर्चिक नसलेली करण्याची मागणी केली.

आधारशी संबंधित योजनांचा लाभ घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक या ओळखपत्रावर अवलंबून आहेत. पेन्शन, अनुदाने आणि आरोग्य सेवा मिळवण्यासाठी आधार क्रमांक अनिवार्य असताना, अशी प्रक्रिया वृद्धांसाठी अडथळा ठरत आहे. नागरिकांनी या प्रक्रियेत जबाबदारी निश्चित करणारी आणि ग्राहकांना मदत करणारी तक्रार निवारण प्रणाली उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. सरकारने तातडीने लक्ष घालून पारदर्शक आणि सर्वसामान्यांना परवडणारी उपाययोजना करावी.